|| श्री दत्तात्रय अष्टक ||

प् ।। नमो सद्गुरू एकनाथ बाबा चव्हाण।। प्

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

दत्तप्रभूंचे घेता मंगल दर्शन
निमिषात येते मन मोहरून
त्रिविध ताप दुःखातूनी होशी मुक्त
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||१||

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

त्रिगुण रुपाने नटला दत्त योगिराणा
शरण जाई मनुजा तू सत्वर गुरुचरणा
अप्राप्य सारेच होईल प्राप्य
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||२||

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

दंड कमंडलूधारी दत्तराज योगी
दिव्य कांती श्री गुरुची नयनांस दिपवी
चित्त वृत्ती साऱ्या क्षणी होतील शांत
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||३||

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

द्त्तनाम संकीर्तनात राही दंग
दत्तकृपेने पालटेल अंतरंग
सतसंगती जगती लाभेल नित्य
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||४||

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

दयाशील दत्तगुरू दासाभिमानी
शरणागतभक्तासी नेई उद्धरुनी
सौख्यशांती लाभूनी मन होईल तृप्त
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||५||

ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ

औदुंबर तळी राहे गुप्त रूपे दत्त

प्रगट होई पाहुनी सेवेतील सातत्य
जाई निघुनी खिन्नता प्रसन्न राही चित्त
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||६||
ó Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ
सुरस मधुर दत्तनाम भवबंधन तोडी
चाख मना नित्य दत्तनामामृत गोडी
मस्तकी ठेवील दत्तराज कृपाहस्त
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||७||
ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ Ǹ ǿ
छंद दत्तनामाविण नको दुजा जीवा
नाम तेज जाळील मद, काम, क्रोध, हेवा
भक्त सखा दत्त नित्य राहील हृदयात
मुखी गर्जता श्री गुरुदेव दत्त ||८||
ó Ǹ ó Ǹ ó Ǹ ó Ǹ ó Ǹ ó Ǹ ó Ǹ ó
Â ầ ų आपला दासानुदास ų Â ầ

Last modified: 20 Dec 2018